# दिव्यांग बालकांच्या समावेशित शिक्षणातील कार्यकारी घटकांच्या गरजांचे विश्लेषण आणि शिक्षणक्रम प्रारूप विकसन


**संशोधक**

**डॉ. संजीवनी राजेश महाले**

सहयोगी प्राध्यापक,( प्रमुख संशोधक)

शिक्षणशास्त्र विद्याशाखा

**श्रीमती साधना लामतुरे**

शैक्षणिक संयोजक(सहसंशोधक)

शिक्षणशास्त्र विद्याशाखा

**श्रीमती विद्यादेवी बागुल**

संशोधक सहायक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा



प्रकल्प आर्थिक सहाय्य

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

वर्ष सन २०१९-२०२०

# अनुक्रमाणिका


| अ. क्र. | शीर्षक |
|---|---|
| ०१) | मुखपृष्ठ |
| ०२) | प्रतिज्ञापत्र |
| ०३) | ऋणनिर्देश |
| ०१) | प्रास्ताविक |
| ०२) | संशोधनाचे शीर्षक |
| ०३) | संशोधनाची उद्दिष्ट्ये |
| ०४) | संशोधनाचे महत्व व गरज |
| ०५) | संशोधनाची गृहितके |
| ०६) | संशोधन कार्यपद्धती(सर्वेक्षण संशोधन पद्धती, नमुना निवड, संशोधनाची साधने ) |
| ०७) | सामग्री विश्लेषण |
| | संसाधन शिक्षक प्रश्नावली विश्लेषण |
| | प्राथमिक शिक्षण प्रश्नावली विश्लेषण |
| | पालक प्रश्नावली विश्लेषण |
| | जिल्हा समन्वयक मुलाखत विश्लेषण |
| | पूर्व प्रशिक्षण साहित्य विश्लेषण |
| ०८) | शिक्षणक्रम प्रारूप विकसन |
| ०९) | सारांश |
| १०) | संदर्भ ग्रंथ सूची |
| ११) | परिशिष्ट – १. संसाधन शिक्षकांची प्रश्नावली |
| | २. प्राथमिक शिक्षकांसाठी प्रश्नावली |
| | ३. पालक प्रश्नावली |
| | ४. जिल्हा समन्वयक मुलाखत प्रश्न |
| | ५. प्रतिसादक यादी (संसाधन शिक्षक, प्राथमिक शिक्षक, पालक, जिल्हा समन्वयक) |

# सारांश

दिव्यांगांसंदर्भातील आंतरराष्ट्रीय/ जागतिक स्तरावरील ठळक प्रयत्न पुढीलप्रमाणे आहेत. मानवी हक्कांचा जाहीरनामा १९४८, संयुक्त राष्ट्रसंघाचा बालहक्काचा मसुदा १९८९, जॉमतिन येथील जागतिक परिषद १९९०, अक्षमता असणाऱ्या व्यक्तींना समान संधीचे संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रमाणित नियम १९९३, विशेष गरजा असणाऱ्यांच्या शिक्षणासाठी सालमान्का आराखडा १९९४, अपंग व्यक्तींच्या हक्कांचे युनायटेड अधिवेशन२००६ , इंचेऑन धोरण २०१२, सहस्त्रकातील विकास ध्येये २०१५.

भारतातील मागासलेल्या घटकांना समान पातळीवर आणण्यासाठी भारतीय संविधानात काही महत्वपूर्ण तरतुदी केलेल्या आहेत. कलम १५ नुसार धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थळ याबाबतीत भेद मानून शिक्षण नाकारता येणार नाही. कलम १५(४), १६(४), २९ (२), ३३०, ३३२, ३३५ नुसार मागासवर्ग व आदिवासी समाजासाठी शिक्षणाची विशेष तरतूद करण्यात आली. भारतीय राज्यघटनेचे कलम ४५ नुसार या कलमाने ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचे व मोफत केलेले आहे.

स्वातंत्र्यानंतर दिव्यांगांसंदर्भातील राष्ट्रीय स्तरावरील ठळक प्रयत्न पुढीलप्रमाणे आहेत. भारतातील पहिली अंध शाळा (१८८७), कोठारी आयोग (१९६४-६६), मानवी हक्क व अपंग व्यक्ती अधिकार (१९७०), अपंग विद्यार्थ्यांसाठी एकात्मिक योजना (१९७४), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६), कृती योजना (१९९२), भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम (१९९२), प्रा. राम मेघे प्राथमिक शिक्षण आयोग (१९९२), समानसंधी, हक्क व संरक्षक व संपूर्ण सहभाग अधिनियम (१९९५), राष्ट्रीय न्यास अधिनियम (१९९९),राष्ट्रीय अभ्यासक्रम रूपरेषा (२०००), महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा (२००१), सर्व शिक्षा अभियान (२००३), राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (२००५), शिक्षण हक्क कायदा (२००९),अपंग व्यक्ती हक्क, अधिनियम (२०१६), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०१९) या योजनांमध्येही दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींना समाजात स्थान देण्यासाठी विविध उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

विविध आयोग, समित्या दिव्यांग विद्यार्थांबाबत शैक्षणिक सेवा उपलब्ध करून देण्याबाबत मार्गदर्शन केले आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार दिव्यांग विद्यार्थांना सामान्य शाळेत प्रवेश दिला जात आहे. प्राथमिक स्तरावरील प्रत्येक शिक्षकाला त्याबाबतचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

दिव्यांग बालकांना सामान्य शाळेत प्रवेश दिल्यानंतर शिक्षक सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांना अध्यापन करतात. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद SCERT पुणे यांच्यामार्फत प्राथमिक शिक्षकांना २००५-२००६ या काळात प्रशिक्षण देण्यात आले. परंतु ते काही निवडक शिक्षकांसाठीच होते २०१९ सालीही त्या शिक्षकांचे पाच पाच दिवसांचे प्रशिक्षण घेण्यात आले. परंतु अध्यापनाच्या दृष्टीकोनातून ते पुरेशे नव्हते.

मुक्त विद्यापीठात कोणताही शिक्षणक्रम राबविण्यापूर्वी त्याचे गरज विश्लेषण केले जाते. ह्या शिक्षणक्रम विकसनासंदर्भातही गरज विश्लेषण करण्यासाठी सदर संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला. त्याचे शीर्षक पुढीलप्रमाणे :

**संशोधन शीर्षक :**

**दिव्यांग बालकांच्या समावेशित शिक्षणातील कार्यकारी घटकांच्या गरजांचे विश्लेषण आणि शिक्षणक्रम प्रारूप विकसन**

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२

## अंतर्गत संज्ञापन पत्र

जा.क्र.....134
दिनांक.28-1-19
आ.क्र.........
दिनांक..........
जा.क्र.............
दिनांक...........
आ.क्र..........
दिनांक..........
कुलसचिव कार्या.
जा.क्र.............
दिनांक...........
कुलसचिव कार्या.
आ.क्र..........
दिनांक..........
कुलगुरु कार्यालय
जा.क्र.............
दिनांक...........
कुलगुरु कार्यालय
आ.क्र..VC19036
दिनांक..29/1/19
जा.क्र.............
दिनांक...........
आ.क्र..........
दिनांक..........

प्रेषक : प्रेषक:डॉ.संजिवनी महाले
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

प्रति :मा.कुलगुरू

विषय : समावेशित शिक्षण शिक्षणक्रम गरज विश्लेषण आणि शिक्षणक्रम प्रारूप विकसन करणेबाबत
धारिका : शिक्षण/2019
दिनांक : 28/01/2019

शिक्षण हक्क अधिनियम २००९ मध्ये सर्व प्रकारच्या बालकांना नियमित शाळेत प्रवेश देणे बंधनकारक आहे. आज सामान्य शाळेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा लागतो. शासनामार्फत २००६ मध्ये समावेशित शिक्षणाबाबत प्रशिक्षण घेण्यात आलेले होते. शालेय व्यवस्थापन, शिक्षक आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांना दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबतचे प्रशिक्षण नसल्याकारणाने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण जास्त आहे.

Rehabilitation Council of India (RCI) यांनी समावेशित शिक्षणासंदर्भात एक प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसित केलेला आहे. परंतु तो केवळ विशेष D.Ed. आणि B.Ed. झालेल्या व्यक्तींसाठीच आहे.

महाराष्ट्रात या स्वरूपाचा कोणताही शिक्षणक्रम उपलब्ध नाही. सदर समस्येची व्याप्ती अतिशय मोठ्या प्रमाणात आहे. मुक्त विद्यापीठामार्फत प्रमाणपत्र स्तराचा शिक्षणक्रम उपलब्ध झाल्यास या विषयासंबंधीचे ज्ञान आणि कौशल्ये संदर्भात अध्यापक, विद्यार्थी, पालक, संस्थाचालक अशा विविध घटकांना उपयोग होऊ शकेल.

संपूर्ण महाराष्ट्रात प्राथमिक स्तरावर हजारोंच्या पटीत शिक्षक कार्यरत आहेत. शाळेत प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांची अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ही दिव्यांगत्वानुसार करणे अनिवार्य आहे. या शिक्षकांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळेत योग्य पद्धतीने सामावून घेण्यासाठी या शिक्षणक्रमाच्या गरज विश्लेषण करण्याची आवश्यकता आहे. त्याबाबतचा संशोधन प्रकल्पाचा सविस्तर आराखडा परिशिष्ट क्र.१ मध्ये दिलेला आहे.

**आर्थिक खर्च पुढीलप्रमाणे:-**

| | |
|---|---|
| १) प्रवास व दैनिक भत्ता | = रु. १०,०००/- |
| २) सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन तज्ज्ञ मानधन | = रु. ३०००/- |
| ३) संशोधन अहवाल अक्षरजुळवणी व मुद्रण | = रु. ५०००/- |
| ४) संशोधनअहवाल झेराक्स व बांधणी (६ प्रती) | = रु. २०००/- |
| ५) निवास खर्च | = रु. ३०००/- |
| ६) किरकोळ खर्च | = रु. २०००/- |
| ७) शिक्षणक्रम प्रारूप विकसन तज्ज्ञ बैठक (TA/DA, बैठक भत्ता, कर्तव्य भोजन) | = रु. ३५,०००/- |
| एकूण | = रु. ६०,०००/- |

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

१) सदर सूक्ष्म संशोधन प्रकल्प घेण्यास मान्यता द्यावी.

२)सामग्री एकत्रीकरणासाठी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी दिव्यांगासंदर्भात कार्यरत अनुभवी व्यक्तींच्या मुलाखती घेण्यासाठी कर्तव्यरजा घेण्यास मान्यता द्यावी.

य. च. म. मुक्त विद्यापीठ वित्त विभाग
आवक क्र. 1007
दिनांक 29-1-19

कुलसचिव कार्यालय
आवक क्र.: 370
दिनांक : 28/01/2019

३) सदर संशोधन प्रकल्पासाठी तात्काळ रेल्वे रिझर्वेशन करण्यास मान्यता द्यावी.

४) विद्यापीठ नियमानुसार निवास खर्च देण्यास मान्यता द्यावी.

५) टॅक्सी/ रिक्षा भाडे प्रत्यक्षात जे लागेल ते देण्यास मान्यता द्यावी.

६) सदर संशोधनासाठी प्रमुख संशोधक म्हणून डॉ. संजीवनी महाले व सहसंशोधक म्हणून श्रीमती साधना लामतुरे आणि संशोधन सहायक श्रीमती विद्यादेवी बागुल यांना मान्यता द्यावी.

७) शिक्षणक्रम प्रारूप विकसन बैठक तज्ञ मानधन प्रति व्यक्ती रु. २०००/- देण्यास मान्यता द्यावी.

८) तज्ञ स्वतंत्र वाहनाने आल्यास प्रत्यक्ष आलेला खर्च विद्यापीठ नियमानुसार देण्यास मान्यता द्यावी.

सदरचा खर्च A.22.P38 – Development of Course Material & QAM 15,50,000/- यातून रु. ६०,०००/- खर्च करण्यास मान्यता द्यावी.

डॉ. संजीवनी राजेश महाले
सहयोगी प्राध्यापक,( प्रमुख संशोधक)
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

श्रीमती साधना लामतुरे
शैक्षणिक संयोजक(सहसंशोधक)
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

श्रीमती विद्यादेवी बागुल
संशोधक सहायक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

मार्फत
डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

मार्फत
मा. कुलसचिव

मार्फत
मा. वित्त अधिकारी

सोबत :- संशोधन प्रकल्पाचा सविस्तर आराखडा परिशिष्ट -१

मा. कुलगुरू